महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION
AMRAVATI DIVISIONAL BOARD, AMRAVATI.444 602.

पत्र क्र.अविमं/माप-के.नि./२०२६/ १८८३
अमरावती दि. ०१/०८/२०२६

प्रति,

मुख्याधापक/प्राचार्य,
सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
अमरावती विभाग.

**विषय – माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु./मार्च २०२७ करिता नविन परीक्षा केंद्र प्रस्तावाबाबत.**

**संदर्भ – १.राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं/परीक्षा -८ /३८६५ दि.२३/०७/२०१९.**

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु./मार्च २०२७ करिता नविन परीक्षा केंद्र प्रस्ताव सादर करण्याकरीता खालील प्रमाणे कार्यवाही निश्चित करण्यात आलेली आहे.

१) नविन परीक्षा केंद्र प्रस्ताव अर्ज किंमत रु १०००/- (रू. एक हजार फक्त)
२) परीक्षा केंद्र प्रस्ताव अर्ज विक्री दि.०१.०९.२०२६ ते दि. ३०.०९.२०२६ पर्यत राहील.
३) परीक्षा केंद्र मागणी करणा-या शाळा /कनिष्ठ महाविद्यालयाने केंद्र मागणी प्रस्ताव गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे शिफारशीसह परिपूर्ण प्रस्ताव दि ३०.०९.२०२६ पर्यत मंडळ कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.
४) नविन परीक्षा केंद्र प्रस्तावासोबत छानणी शुल्क म्हणून रु १०,०००/- (रू. दहा हजार फक्त) चा धनाकर्ष (ना परतावा) विभागीय सचिव, अमरावती विभागीय मंडळ, अमरावती या नावे जोडण्यात यावा.

अ) नविन परीक्षा केंद्रासाठी आवश्यक विद्यार्थी संख्या -

| | इयत्ता १० वी | इयत्ता १२ वी |
|---|---|---|
| शहरी भाग | २५० | ३०० |
| ग्रामीण भाग | २०० | २५० |
| अतिदूर्गम भागासाठी (नैसर्गिक अडथळे) | १२५ | १५० |

ब) नियोजित केंद्रापासून शाळेचे अंतर

| | इयत्ता १० वी | इयत्ता १२ वी |
|---|---|---|
| शहरी भाग | अट नाही | अट नाही |
| ग्रामीण भाग | ०५ कि.मि. | १० कि.मि |

टिप- १) नवीन परीक्षा केंद्राची मागणी करणा-या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाने कोणतीही शाळा /कनिष्ठ महाविद्यालय केंद्र ओलांडून आपल्या केंद्रावर येणार नाही, अशाच शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांचे संमतीपत्र घ्यावे.
२) परीक्षा केंद्रावर समाविष्ट शाळांची संख्या किमान २ शाळा / कनिष्ठ महाविद्यालये असावे. परंतु, शक्यतो दोन्ही शाळा / क.म.वि. या एकाच संस्थेच्या नसाव्यात.
३) नव्याने सांकेतांक प्राप्त शाळा/क.म.वि. यांना किमान दोन वर्षापर्यत परीक्षा केंद्राकरीता अर्ज सादर करता येणार नाही. जून्या परीक्षा केंद्रावरील विद्यार्थी संख्येवर विपरीत परिणाम होऊ नये. संलग्न होणा-या शाळा/क.म.वि. नविन समाविष्ठ होत असल्याबाबत मूळ केंद्राचे अभिप्राय सोबत जोडावे.
४) नविन केंद्र प्रस्ताव विहीत निकष विचारात घेवून योग्य व परिपूर्ण भरुनच कार्यालयास सादर करावा.

(प्रिया देशमुख)
विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.